**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

## प्रेसनोट

दिनांक :- २७/११/२०१८

## दिंडोरी तालुक्यात ४२ लाखांचा गुटखा जप्त - स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

जनआरोग्याच्या दृष्टीने गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखु तसेच आरोग्यास हानिकारक असणा-या खाद्य पदार्थांची विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतुक आदी व्यवसायांना आळा घालुन त्यावर पुर्ण प्रतिबंध होण्यासाठी शासनाने आदेश दिलेले आहे. दिनांक २६/११/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नाशिक ते वणी रोडवर करंजखेड फाटा परिसरात सापळा रचुन नाशिक बाजुकडे येणारे आयशर वाहनावर छापा टाकुन महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुमारे ४२ लाख रूपये किंमतीचा अवैध गुटखा व आयशर वाहन असा **एकुण ५३ लाख रूपये किंमतीचा मद्देमाल** जप्त केला आहे.

दिनांक २६/११/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी असे अवैध धंदयावर कारवाई करणेसाठी दिंडोरी व कळवण तालुक्यात गस्त घालत होते, दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार नाशिक ते वणी रोडवर एक आयशर ट्रकमध्ये काही इसम अवैधरित्या गुटख्याची वाहतुक करीत असलेबाबत खात्रीशीर बातमी मिळाली. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने लागलीच वणी बाजुकडुन नाशिक बाजुकडे येत असलेले **आयशर वाहन क्र.एचएच १४ ईएम ३४९७** या वाहनाचा पाठलाग करून करंजखेड फाटयाजवळ सदर वाहन अडविले. सदर वाहनावरील चालक **नामे उध्दव रामराव राठोड, वय २३, रा. चिमेगाव, ता.औराई, जि.बिदर**, राज्य कर्नाटक हल्ली डांगे चौक, **पिंपरी चिंचवड, पुणे** यास जागेवरच ताब्यात घेण्यात आले. सदर आयशर ट्रकची झडती घेतली असता त्यामध्ये महाराष्ट्र राज्यात विक्री/उत्पादनास प्रतिबंध असलेला अवैध गुटखा मिळुन आला. सदर छाप्यात **आर.एम.डी., एम.सुगंधी तंबाखु, मिराज सुगंधी तंबाखु, तुलशी रॉयल जाफरानी सुगंधी तंबाखु, रजनीगंधा पानमसाला, विमल पानमसाला, व्ही सुगंधी तंबाखु** असा गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखु असलेल्या गोण्यामधील ३०,६०० पुडे किं. रू.४२ लाख ०८ हजार ६०० व आयशर ट्रक असा **एकुण ५३ लाख ०८ हजार ६०० रू.** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर प्रकरणी नाशिक अन्न व औषध प्रशासन विभागाकडील अधिकारी यांनी तपासणी करून **वणी पोलीस ठाणेस** ।। गुन्हा रजि. नं. ३८/२०१८ भादवि कलम १८८,२७२,२७३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल सो**, यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि **श्री. आशिष आडसुळ**, पोहवा दिपक आहिरे, संजय गोसावी, पुंडलीक राउत, दिलीप घुले, दत्तात्रय साबळे, गणेश वराडे, पोना अमोल घुगे, प्रविण सानप, पोकॉ विश्वनाथ काकड यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे.